# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
## (पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

## अंतर्गत परिपत्रक

**विषय : विविध विभागांमध्ये टिपणीद्वारे/रिटेनरशिप तत्वावर हंगामी/कंत्राटी स्वरुपात करण्यात आलेल्या नियुक्त्यांबाबत.**

**संदर्भ :** १) परिपत्रक क्र.४५/२०१९ जावक क्र.एएन/१०६०, दिनांक २२.०३.२०१९
२) परिपत्रक क्र.४५/२०१९ जावक क्र.एएन/१०६०, दिनांक २२.०३.२०१९
३) शासन निर्णय क्र.लोअप्र-२०१३/प्र.क्र.१६९/१३/विशि-१, दिनांक ०४.०९.२०१८

उपरोक्त संदर्भाकित परिपत्रकान्वये तात्पुरत्या स्वरुपात नियुक्त्या करताना प्रशासनामार्फत मान्यता घेऊन विहित प्रक्रियेचा अवलंब करावा, असे कळविण्यात आलेले आहे. तसेच महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्र शिक्षण विभागाने शासन निर्णय क्र.लोअप्र-२०१३/प्र.क्र.१६९/१३/विशि-१, दिनांक ०४ सप्टेंबर, २०१८ अन्वये हंगामी/कंत्राटी तसेच विविध पदांची भरतीप्रक्रिया राबविताना कोणतीही अनियमितता होऊ नये याची दक्षता घेण्याबाबत त्याचप्रमाणे भरतीसाठी विहित कार्यपध्दतीचा अवलंब करण्याबाबत सर्व अकृषी विद्यापीठांना निर्देश दिलेले आहेत. त्यानुसार मा.शिक्षण सहसंचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी संदर्भ क्र.युएनआय/(११२/१८)/अधि.३/विशि-१/१६५५२, दिनांक १९ सप्टेंबर, २०१८ रोजीच्या पत्रान्वये सदर शासन निर्णयात दिलेल्या सुचनांप्रमाणे आवश्यक कार्यवाही करण्याबाबत विद्यापीठास कळविले आहे. शासनाचे सदर निर्देश महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ मधील कलम ५(८१) नुसार विद्यापीठावर बंधनकारक आहेत. परंतु सदर शासन निर्णयानुसार व विद्यापीठ परिपत्रकानुसार कार्यवाही होत नसल्याचे प्रशासनाच्या निदर्शनास आले आहे.

विद्यापीठाच्या काही विभागांनी विभागाच्या स्तरावर विभागाच्या उपलब्ध निधीतून तत्कालीन तात्पुरत्या स्वरुपाच्या मनुष्यबळाच्या गरजेची पूर्तता करण्यासाठी टिपणीव्दारे/रिटेनरशिप तत्त्वावर/रोजंदारीवर विहित प्रक्रियेचा अवलंब न करता सहभागी करुन घेण्यात आलेल्या काही सेवकांनी विविध न्यायालयामध्ये त्यांचेवर अन्याय झाल्याची तक्रार करुन याचिका दाखल केलेल्या आहेत. दरम्यान सदर टिपणीमध्ये नमूद कालावधीची व पर्यायाने नियुक्तीची मुदत संपल्याने या व्यक्तींच्या मुदतवाढीचा प्रश्न प्रलंबित होता. याच कालावधीत कोव्हीड-१९ महामारीमुळे झालेल्या टाळेबंदी दरम्यान सहानुभूतीपूर्वक विचार करुन प्रशासन शिक्षकेतर कक्षाने विद्यापीठाच्या विविध विभागात कार्यरत या व्यक्तींच्या तात्पुरत्या स्वरुपात मुदतवाढीचा एकत्रित प्रस्ताव सादर करुन या व्यक्तींच्या सेवा काही कालावधीकरिता सुरु ठेवल्या.

सदर व्यक्तींच्या सेवा उपलब्ध करुन घेण्याची मूळ कार्यवाही विद्यापीठाच्या प्रशासन शिक्षकेतर कक्षामार्फत पार पाडण्यात आलेली नसून संबंधित विभागाच्या स्तरावर पार पाडण्यात आली आहे. सदर व्यक्तींच्या सेवेची आवश्यकता व त्याअनुषंगिक कार्यवाही ही पूर्णतः विभागाच्या स्तरावरील बाब आहे.

सबब, सर्व संबंधित विभागप्रमुख/शाखाप्रमुख यांना कळविण्यात येते की, अशाप्रकारची प्रकरणे आपल्या अधिनस्त विभागात असल्यास या संदर्भात आवश्यक कार्यवाही त्यांच्या स्तरावर करुन सदर व्यक्तींच्या सेवेसंदर्भात योग्य निर्णय घ्यावा व त्यानुसार संबंधितांना अवगत करण्यात यावे. विद्यापीठातील विविध विभागांच्या स्तरावर अशी कार्यवाही पार पाडली न गेल्यास अशा व्यक्तींच्या सेवेसंदर्भात उद्भवणाऱ्या प्रकरणांमध्ये सर्व संबंधित विभागप्रमुख/शाखाप्रमुख सर्वस्वी जबाबदार राहतील.

दिनांक ०१/०६/२०२१ पासून या संदर्भात कोणतीही कार्यवाही प्रशासन शिक्षकेतर कक्षाकडून केली जाणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी.

**(डॉ.प्रफुल्ल पवार)**
**कुलसचिव**

गणेशखिंड, पुणे ४११ ००७.
जावक क्र. एएन/१४३९
दिनांक : १४/०५/२०२१

**प्रत माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी :-**

१. मा.विभागप्रमुख, सर्व शैक्षणिक विभाग
२. सर्व शाखाप्रमुख, सर्व प्रशासकीय विभाग

} आपणास विनंती की, सदर परिपत्रक सर्व संबंधितांच्या निदर्शनास आणावे.

C:\Users\Dell\Documents\Non-Teaching\2021\Circular\Govt. Circular.docx

# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

**परिपत्रक क्र. ४५ /२०१९**

विद्यापीठातील विविध शैक्षणिक आणि प्रशासकीय विभागांमध्ये विद्यापीठ निधीतून किंवा विभागाच्या अर्थशिर्षातंर्गत/प्रकल्पांतर्गत तात्पुरत्या स्वरुपात / रिटेनरशिप / रोजंदारीवर सेवकांची नियुक्ती करण्यात येते. सदर बाबतीत असे निर्दशनास आले आहे की, अशा प्रकारे नियुक्ती करताना प्रशासकीय मान्यता घेण्यात येत नाही.

या परिपत्रकाद्वारे सर्व संबंधितांना कळविण्यात येते की, यापुढे अशा कोणत्याही प्रकारे नियुक्ती करताना प्रस्ताव प्रशासनामार्फत मान्यता घेऊन, विहित प्रक्रियेचा अवलंब करुनच नियुक्ती करण्यात यावी.

मनुष्यबळाबाबतचे प्रस्ताव प्रशासन शिक्षकेतर विभागास सादर करताना, सदर प्रस्तावात प्रकल्पाचे नाव, प्रकल्पाच्या कामकाजाचे स्वरुप, प्रकल्पाचा कालावधी, प्रकल्पाकरिता आवश्यक असणा-या सेवकवर्गाची संख्या, आवश्यक शैक्षणिक अर्हता व अनुभव, एकत्रित वेतन/मानधन/विद्यावेतन, अंदाजे खर्च (वेतनापोटी), अर्थशीर्ष इत्यादी बाबींचा उल्लेख असणे आवश्यक आहे.

**(डॉ.प्रफुल्ल पवार)**
कुलसचिव

गणेशखिंड, पुणे ४११ ००७.
जावक क्र. एएन/1060
दिनांक :22 MAR 2019

**प्रत माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी :-**

१) सर्व मा.शैक्षणिक विभागप्रमुख
२) सर्व मा.प्रशासकीय शाखाप्रमुख
३) मा.वित्त व लेखा अधिकारी, वित्त विभाग - माहे एप्रिल, २०१९ पासून मनुष्यबळाबाबतच्या प्रस्तावास प्रशासनाची मान्यता असल्याशिवाय वेतनाची देयके अदा करु नयेत.

D:\Documents\2019\Circular.docx

महाराष्ट्र शासन
शिक्षण संचालनालय(उच्च शिक्षण)
महाराष्ट्र राज्य, पुणे- ४११ ००१.

www.dhepune.gov.in Email- vishi.dhepune@nic.in

फोन नं.०२०/२६१२२११९,२६०५१५१२, २६१२४६३९ फॅक्स०२०/२६१११९५३

क्रमांक- युएनआय/(११२/१८)/अधी.३/विशि-१/16552 दिनांक- 19 SEP 2018

प्रति,

सर्व विभागीय सहसंचालक,
उच्च शिक्षण,
महाराष्ट्र राज्य.

कुलसचिव,
सर्व अकृषी विद्यापीठे,
महाराष्ट्र राज्य.

**विषय- विविध पदांची भरती प्रक्रिया राबवितांना अनियमितता होऊ नये यासाठी अकृषी विद्यापीठांना सूचना देण्याबाबत.**

संदर्भ- शासन निर्णय उच्च व तंत्र शिक्षण विभाग क्रमांक लोअप्र२०१३/ प्र.क्र.१६९/१३/विशि-१ दिनांक ४ सप्टेंबर, २०१८

उपरोक्त विषयाबाबतच्या संदर्भिय शासन निर्णयाची प्रत सोबत जोडली आहे, कृपया अवलोकनी घ्यावी.

वरील संदर्भिय पत्रानुसार कळविण्यात येते की, आपल्या विद्यापीठामध्ये विविध भरती प्रक्रिया राबवितांना अनियमितता होऊ नये म्हणून अकृषी विद्यापीठांनी संदर्भिय शासन निर्णयात दिलेल्या सूचनाप्रमाणे आवश्यक कार्यवाही करावी.

या संदर्भात भरती केलेल्या कर्मचा-यांच्या बाबतीत पुढे कोणतीही अनियमितता आढळून आल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी ही विद्यापीठांचे कुलगुरु/कुलसचिव यांची राहील व अशा कर्मचा-यांच्या वेतनविषयक लाभाची जबाबदारी देखील संबंधित विद्यापीठांची राहील.

(डॉ.मोहन खताळ)
शिक्षण सहसंचालक(उच्च शिक्षण)
महाराष्ट्र राज्य, पुणे-१.

प्रत- मा.सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई- ४०० ०३२ यांना माहितीस्तव सादर.

DY. R. (N.T.)
21/9/18

विविध पदांची भरती प्रक्रिया राबविताना अनियमितता होऊ नये यासाठी अकृषि विद्यापीठांना सूचना देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्र शिक्षण विभाग
शासन निर्णय क्रमांकः लोअप्र- २०१३/प्र.क्र. १६९/१३/विशि-१
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
तारीख: ०४ सप्टेंबर, २०१८

## परिपत्रक

अकृषि विद्यापीठामध्ये शासन मान्य विविध पदावर पदभरती करण्याबाबतची प्रक्रिया प्रचलित नियमानुसार विहित केलेली आहे. तथापि, भरती प्रक्रिया राबविताना विद्यापीठांकडून विहित जाहिरात न देणे, कर्मचारी विहित शैक्षणिक अर्हता, पात्रता, अनुभव, वयाची अट धारण न करणे इ. बाबी विद्यापीठाकडून विचारात घेण्यात येत नसल्याचे बऱ्याच प्रकरणांत आढळून आले आहे. अशा प्रकारे नियुक्त झालेले कर्मचारी बराच काळ शासन मान्य पदावर कार्यरत राहतात. अशा कर्मचाऱ्यांच्या सेवा नियमित करण्याबाबत प्रकरणे शासनाकडे सादर केली जातात. परंतु अशा प्रकारच्या अनियमिततेतून सूट देणे/अटी शिथिल करण्याबाबत कोणत्याही तरतुदी नसल्याने त्यामधून सुट देता येत नाही. त्यामुळे असे कर्मचारी त्याच्या सेवा नियमित करून वेतनविषयक/सेवानिवृत्तीचे लाभ मिळावे यासाठी मा. न्यायालयात धाव घेतात व मा. न्यायालयाच्या आदेशानुसार अशा अपात्र कर्मचाऱ्यांच्या सेवा नियमित करून त्यांना सेवाविषयक लाभ देण्याची वेळ शासनावर येते. उक्त बाबी विचारात घेऊन शासन मान्य विविध पदांची भरती प्रक्रिया राबविताना अकृषि विद्यापीठांनी खालील सूचनांचे कटाक्षाने पालन करावे.

१) विद्यापीठामध्ये हंगामी/कत्राटी स्वरूपात भरती करताना सामान्य प्रशासन विभागाने दि.२५ ऑगस्ट, २००५ च्या परिपत्रकातील तरतुदी व तदनुषंगाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या सूचनांचे काटेकोर पणे पालन करावे.

२) शासन मान्य पदावर पदभरती करताना त्या त्या पदांसाठी विहित केलेली शैक्षणिक अर्हता, पात्रता, अनुभव, वयाची अट, तसेच तांत्रिक अर्हता, अनुभव इ. विचारात घेऊन, जाहिरातीव्दारे विहित पध्दतीचा अवलंब करूनच पदभरतीची कार्यवाही करावी.

३) पदभरती बाबतचे शासनाचे धोरण/नियम, विद्यापीठ अधिनियमातील तरतुदी, इ. बाबी विचारात घेऊन पदभरतीची कार्यवाही करण्याची व त्यामध्ये कोणत्याही प्रकारची अनियमितता होणार नाही याची दक्षता घेण्यात यावी.

४) विद्यापीठामध्ये भरती केलेल्या कर्मचाऱ्यांच्या बाबतीत पुढे कोणतीही अनियमितता आढळून आल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित विद्यापीठाचे कुलगुरू/कुलसचिव यांची राहील व अशा कर्मचाऱ्यांच्या वेतनविषयक लाभाची जबाबदारी देखील संबंधित विद्यापीठाची राहील.

२. सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक <संकेतांक क्रमांक लिहा> असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे. 201809041242488508

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

विजय साबळे
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा.मुंबई ,राजभवन मलबार हिल ,राज्यपाल तथा कुलपती यांचे सचिव .
२. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव,मुंबई ,मंत्रालय ,
३. मा. मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण विभाग यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
४. मा. राज्यमंत्री, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मंबई,
५. मा. कुलगुरू ,सर्व अकृषि विद्यापीठे.
६. संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे,
७. सर्व विभागीय सहसंचालक,उच्च शिक्षण ,
८. कुलसचिव ,सर्व अकृषि विद्यापीठे
९. निवड नस्ती (विशि-१)

| | |
|---|---|
| Subject | **Government Resolution Dated 04.09.2018** |
| From | <"विशी शाखा, उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य" <vishi.dhepun> |
| Sender | <vishi.dhepune@gov.in> |
| To | <reg@sgbau.ac.in>, <registrar@bamu.ac.in>, <registrar.gondwanauniversity@gmail.com>, <gug.registrar@gmail.com>, <registrar@nmu.ac.in>, <registrar@unishivaji.ac.in>, <registrar@fort.mu.ac.in>, <registrar@nagpuruniversity.nic.in>, <srtmunregistrar@gmail.com>, <regis@unipune.ac.in> 6 more... |
| Cc | <jdhengp@rediffmail.com>, <jdhekop@gmail.com>, <jdheamt@yahoo.com>, <jdheaur_2007@rediffmail.com>, <jdhepune@gmail.com>, <jdhe.nanded@yahoo.co.in>, <jdhejal@yahoo.co.in>, <jdhemum.dhepune@nic.in>, <jtdire.1115@gmail.com>, <jdhemumbai@gmail.com> 8 more... |
| Date | 2018-09-19 17:50 |

- Government Resoulation Dated 04.09.2018.pdf (~1.0 MB)

Res Sir/Madam

Pl. see the attachment

--
आपला विश्वासू,

( सुयश दुसाने)
प्रशासन अधिकारी,
शिक्षण संचालनालय ( उच्च शिक्षण)
महाराष्ट्र राज्य,
मध्यवर्ती इमारत, पुणे - ४११ ००१